ePaper

**स्पेनचा विश्वविजयी जल्लोष; 428 कोटींच्या बक्षिसाने रचला इतिहास!**



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | सोमवार, दि. 20 जून 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


पान 3 वरुन...

मोशीतील विषारी धुरावर महापौरांचा दणका...

## दिल्लीत संसद परिसरात मोर्चा, लाठीचार्ज आणि गोंधळ

# आंदोलन चिघळलं!

महाईन्यूज । नवी दिल्ली

**नीट आणि टीईटी पेपरफुटीच्या निषेधार्थ कॉकरोच जनता पार्टी (सीजेपी)च्या वतीने राजधानी दिल्लीत आयोजित करण्यात आलेले आंदोलन सोमवारी चिघळले. जंतर-मंतर येथून संसद भवनाकडे मोर्चा काढण्याचा प्रयत्न करणाऱ्या हजारो कार्यकर्त्यांना पोलिसांनी अडवले. आंदोलकांनी माघार घेण्यास नकार दिल्यानंतर पोलिसांनी लाठीचार्ज करत अश्रूधुराच्या नळकांड्या फोडल्या. या घटनेमुळे दिल्लीतील वातावरण तणावपूर्ण बनले.**

सकाळपासूनच जंतर-मंतर परिसरात मोठ्या संख्येने आंदोलक जमले होते. संसद भवनासमोर धरणे आंदोलन करण्याच्या भूमिकेवर ते ठाम असल्याने पोलिसांनी सुरुवातीला त्यांना ताब्यात घेण्याची कारवाई केली. मात्र, आंदोलन अधिक तीव्र झाल्यानंतर बळाचा वापर करण्यात आला. शांततापूर्ण आंदोलन दडपण्यासाठी पोलिसांनी अनावश्यक शक्तीचा वापर केल्याचा आरोप सीजेपीने केला आहे. अनेक महिला आंदोलकांशी गैरवर्तन झाल्याचाही आरोप संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केला.

दरम्यान, आंदोलन सुरू असतानाच सीजेपीच्या शिष्टमंडळाने भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांची भेट घेतली. सुमारे दोन तास प्रतीक्षा केल्यानंतर झालेल्या चर्चेत आंदोलकांनी आपल्या मागण्यांचे लेखी निवेदन सादर केले. सरकारने मागण्यांवर सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन दिल्याचे नड्डा यांनी सांगितले. तसेच आंदोलकांवर कोणतीही दडपशाही केली जाणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

मात्र,सरकारकडून ठोस निर्णय होत नाही तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याची भूमिका सीजेपीने कायम ठेवली आहे. आंदोलनाला देशभरातून पाठिंबा मिळत असल्याचा दावा संघटनेने केला आहे.




### CJP शिष्टमंडळाची भाजप नेते जेपी नड्डा यांच्याशी चर्चा

दिल्लीत आंदोलन चिघळत असताना दुसरीकडे सीजेपीच्या शिष्टमंडळाने केंद्रीय भाजप नेते जे. पी. नड्डा यांची भेट घेतली. सुमारे २ तास वाट पाहिल्यानंतर नड्डा आणि आंदोलकांमध्ये चर्चा झाली. मात्र, दोन तास वाट पाहायला लावून केवळ १० मिनिटेच चर्चेसाठी दिली, असा आरोप आंदोलकांनी बैठकीनंतर केला.

### चर्चेनंतर जेपी नड्डा काय म्हणाले?

आंदोलकांसोबत झालेल्या चर्चेबाबत माहिती देताना जे पी नड्डा म्हणाले, आज सकाळी पहिल्यांदाच आंदोलकांकडून सरकारसोबत चर्चा करण्याचा प्रस्ताव आला. सकाळी ११:५० पासून आमची चर्चा सुरू झाली आणि ही बैठक अतिशय सौहार्दपूर्ण वातावरणात पार पडली. शिष्टमंडळासोबत सुरुवातीला सविस्तर तोंडी चर्चा झाली आणि दुपारी ४ वाजेच्या सुमारास त्यांनी मला लेखी निवेदन सादर केले. मी सर्व आंदोलकांना धरणे आंदोलन संपवून परिस्थिती पूर्ववत करण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करण्याची विनंती केली आहे.






# महावितरणचे मोठे पाऊल!

## ग्राहकांच्या मनातील गैरसमज आणि अफवा दूर करण्यासाठी थेट गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये जनजागृती

**महाईन्यूज । पुणे**

**स्मार्ट मीटर बसवण्याबाबत ग्राहकांच्या मनात असलेल्या शंकांचे निरसन करण्यासाठी 'महावितरण'कडून विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. स्मार्ट मीटर मोहिमेअंतर्गत महावितरणचे अधिकारी व कर्मचारी गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये जाऊन मेळावे घेत आहेत. त्यासाठी विशेष पथकांची निर्मिती करण्यात आली आहे. ही पथके मोठमोठ्या गृहनिर्माण संस्थांमध्ये जाऊन तेथील सभासदांना एकत्र करुन स्मार्ट मीटरचे फायदे समजावून सांगत आहेत.**




त्यांच्या विविध प्रश्नांना उत्तरे देऊन त्यांचे गैरसमज दूर करत आहेत, अशी माहिती महावितरणकडून निवेदनाद्वारे देण्यात आली.

महावितरणतर्फे राबविण्यात येत असलेल्या स्मार्ट मीटर मोहिमेला पुणे शहरात आणि परिसरात ग्राहकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. या विशेष मोहिमेमुळे पुणे विभागात १४ लाख १३ हजार १९३ स्मार्ट मीटर बसविण्यात आले आहेत.

स्मार्ट मीटरच्या जनजागृतीसाठी मुख्य अभियंता सुनिल काकडे यांनी विभागांनुसार पूर्णवेळ पथके तयार केली आहेत. प्रत्येक पथकांमध्ये दोन अभियंत्यांसह पाच जणांचा समावेश असून, ही पथके मोठमोठ्या गृहनिर्माण संस्थांमध्ये जाऊन तेथील सभासदांना एकत्र करुन स्मार्ट मीटरचे फायदे समजावून सांगत आहेत. त्यांच्या विविध प्रश्नांना उत्तरे देऊन त्यांचा गैरसमज दूर करत आहेत. एका आठवड्यात या पथकांनी सुमारे दोनशे मेळावे घेऊन ४० हजारांहून अधिक वीज ग्राहकांच्या शंकाचे निरसन करण्यात आले आहे. त्याशिवाय दोन चित्ररथ (LED VAN) गर्दीच्या ठिकाणी स्मार्ट मीटर बसविण्याबाबत जनजागृती करत असल्याची माहिती 'महावितरण'कडून देण्यात आली.

पुणे विभागात सुमारे ३९ लाख वीज मीटर आहेत. त्यापैकी गणेशखिंड शहर विभागात ५ लाख २८ हजार ३२६, रास्तापेठ शहर विभागात ५ लाख २४ हजार २२२ आणि पुणे ग्रामीण विभागात ३ लाख ६० हजार ६४५ स्मार्ट मीटर बसविण्यात आल्याचेही 'महावितरण'कडून स्पष्ट करण्यात आले. 'स्मार्ट मीटर हे ग्राहकांच्या सोयीसाठी आणि वीज वितरण यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे. सोशल मिडियाद्वारे पसरविल्या जाणाऱ्या अफवांवर विश्वास न ठेवता सोसायटीत कर्मचाऱ्यांची पथके आल्यास त्यांच्याकडून शंकांचे निरसन करून घ्यावे. आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करून सहकार्य करावे,' असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

### 'स्मार्ट मीटरचे फायदे'

सकाळी ९ ते संध्याकाळी ५ या वेळेत वीज वापरल्यास ग्राहकांना प्रति युनिट ८५ पैसे इतकी (TOD – TIME OF DAY) सवलत वीजबिलात मिळते. मानवी हस्तक्षेपाशिवाय डिजिटल रिडिंग होत असल्याने चुकीच्या किंवा अंदाजे बिलाची शक्यता पूर्णपणे संपुष्टात येते. ग्राहक मोबाईल ॲपद्वारे आपल्या दैनंदिन आणि तासाभराच्या वीज वापराचा आलेख कधीही पाहू शकतात. यामुळे ग्राहकाला वीजबचतीचे नियोजन करता येते. तांत्रिक बिघाड किंवा वीज पुरवठ्यातील समस्येची माहिती महावितरणला तात्काळ समजते, ज्यामुळे बिघाड लवकर दुरुस्त करणे शक्य होते.

## कॉक्रोज जनता पार्टीच्या आंदोलनाला पुणे स्टेशन परिसरात हजारो विद्यार्थ्यांचा पाठिंबा

**महाईन्यूज । पुणे**

**कॉक्रोज जनता पार्टीच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी मुंबईपाठोपाठ पुण्यात पुणे स्टेशन परिसरातील आंबेडकर पुतळ्याजवळ विद्यार्थ्यांनी आंदोलन केले आहे. मोठ्या संख्येने या आंदोलनात तरुण सहभागी झाले आहेत. यावेळी आंदोलकांकडून केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली आहे. पुणे स्टेशन परिसरात या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.**




शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान राजीनामा द्या, इंकलाम जिंदाबादच्या, नीट परीक्षा रद्द करा असे पोस्टर घेऊन विद्यार्थी आंदोलनात सहभागी झाले आहेत.

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत कॉक्रोज जनता पार्टीने राजधानी दिल्लीत सुरू केलेले आंदोलन अधिकच तीव्र झाले आहे. आज आंदोलकांकडून संसदेवर मोर्चाही काढण्यात आला. दरम्यान, केंद्र सरकारविरोधातील हे आंदोलन अधिकच तीव्र झालेले असतानाच विद्यार्थ्यांना मारहाण झाल्याचे अमोर आले आहे. नीट परीक्षेतील पेपरफुटी आणि शिक्षणक्षेत्रातील अनागोंदी विरोधात आंदोलन करत असलेल्या कॉक्रोज जनता पार्टीच्या आंदोलकांच्या मोर्चाने संसदेच्या दिशेने कूच केली. हा मोर्चा संसद भवनाजवळ थोड्याच वेळात दाखल झाल्यावर आंदोलकांना रोखण्यासाठी संसद भवन आणि आसपासच्या परिसरात कडेकोड पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. त्यावेळी विद्यार्थ्यांवर अश्रुधुराच्या नळकांड्या सोडण्यात आल्या. तसेच त्यांच्यावर वाईट पद्धतीने लाठीचार्ज करण्यात आला आहे.

या आंदोलनामुळे राजधानी दिल्लीतील वातावरण चांगलेच तापले असून, अनेक ठिकाणी वाहतुकीवरही परिणाम झाल्याचे पाहायला मिळाले. आंदोलक विद्यार्थ्यांनी "शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान राजीनामा द्या", "नीट परीक्षा रद्द करा" आणि "इंकलाब जिंदाबाद" अशा घोषणा देत केंद्र सरकारविरोधात जोरदार निदर्शने केली. विद्यार्थ्यांनी नीट परीक्षेतील कथित गैरव्यवहाराची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

### सरकार चर्चेला तयार

दरम्यान, केंद्र सरकार आमच्याशी चर्चेस तयार झाले आहे. संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी केंद्र सरकारचे मंत्री जे. पी. नड्डा यांच्यासोबत सीजेपी प्रतिनिधींची महत्त्वाची बैठक होणार आहे, असा दावा कॉक्रोज जनता पार्टीकडून करण्यात आला आहे. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी काही आंदोलकांना ताब्यात घेतल्याचीही माहिती समोर आली आहे. या घटनेनंतर विरोधी पक्षांनी केंद्र सरकारवर टीका करत विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली आहे.

# निगडीत कचरा टाकण्यास नागरिकांचा तीव्र विरोध

## मोशी दुर्घटनेनंतर देहूरोड कॅन्टोन्मेंटच्या जागेचा पर्याय; स्थानिकांचा आक्रमक पवित्रा

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**मोशी कचरा प्रक्रिया केंद्रातील दुर्घटनेनंतर पिंपरी-चिंचवड महापालिकेने तात्पुरत्या स्वरूपात निगडीजवळील देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या ट्रेंचिंग ग्राऊंडवर कचरा साठविण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, या निर्णयाला स्थानिक नागरिक आणि पदाधिकाऱ्यांनी तीव्र विरोध दर्शविला असून, नगरसेवक प्रा. उत्तम केंदळे, सामाजिक कार्यकर्ते आप्पा नरळे आणि रामदास कुटे यांच्या नेतृत्वाखाली कचरा वाहतूक करणाऱ्या गाड्या रोखण्यात आल्या.**




मोशी कचरा डेपोतील दुर्घटनेमुळे निर्माण झालेल्या आपत्कालीन परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महापालिकेने देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाकडे तात्पुरत्या परवानगीची मागणी केली होती. त्यानुसार, स्टेशन मुख्यालय, देहूरोड यांनी १३ जुलै २०२६ रोजी पत्राद्वारे १२ ते १८ जुलै या कालावधीत दररोज ३० वाहनांमधील कचरा निर्दिष्ट जागेवर टाकण्यास परवानगी दिली होती.

मात्र, निगडी परिसरात कचरा टाकण्यास सुरुवात होताच स्थानिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली. "मोशीचा प्रश्न सोडवण्यासाठी निगडीकरांच्या आरोग्याशी तडजोड केली जाणार नाही," अशी भूमिका घेत नगरसेवक प्रा. उत्तम केंदळे, सामाजिक कार्यकर्ते आप्पा नरळे आणि रामदास कुटे यांनी नागरिकांसह घटनास्थळी धाव घेत कचरा गाड्या अडविल्या.

स्थानिकांनी प्रशासनावर टीका करत, कोणत्याही प्रकारची पूर्वसूचना किंवा जनसुनावणी न घेता परिसरात कचरा टाकण्याचा निर्णय घेतल्याचा आरोप केला. तसेच, कचऱ्यामुळे दुर्गंधी, प्रदूषण आणि आरोग्याच्या समस्या निर्माण होण्याची भीती व्यक्त करण्यात आली.

दरम्यान, देहूरोड स्टेशन कमांडर ब्रिगेडियर आशीष कटोच यांनी दिलेल्या परवानगीपत्रात महापालिकेने दिलेल्या आश्वासनांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र, स्थानिकांच्या विरोधानंतर या ठिकाणी कचरा साठविण्याचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

> "मोशी कचरा डेपोतील दुर्घटनेनंतर प्रशासनाने पर्यायी व्यवस्था करणे आवश्यक आहे, याबाबत कोणाचेही दुमत नाही. मात्र, त्यासाठी निगडीकरांच्या आरोग्याशी आणि पर्यावरणाशी खेळ करण्याचा अधिकार कोणालाही नाही. कोणतीही पूर्वकल्पना न देता आणि स्थानिक नागरिकांचा विश्वासात न घेता निगडी परिसरात कचरा टाकण्याचा निर्णय घेण्यात आला. आम्ही विकासाच्या विरोधात नाही, पण नागरिकांच्या जिवाशी संबंधित प्रश्नांवर तडजोडही करणार नाही. जोपर्यंत प्रशासन या निर्णयाचा पुनर्विचार करत नाही, तोपर्यंत आमचा लोकशाही मार्गाने संघर्ष सुरू राहील."
>
> **- प्रा. उत्तम केंदळे, नगरसेवक, भाजपा.**

मोशी दुर्घटनेनंतर शहरातील कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न गंभीर बनला असून, महापालिकेसमोर पर्यायी व्यवस्था उभारण्याचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे. निगडीतील वाढत्या विरोधामुळे प्रशासन पुढील निर्णय काय घेते, याकडे आता संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

### 'निगडी डम्पिंग ग्राऊंड होऊ देणार नाही'

मोशी कचरा डेपो दुर्घटनेनंतर निगडी परिसरात तात्पुरता कचरा टाकण्याच्या निर्णयाविरोधात स्थानिक नागरिक आक्रमक झाले. नगरसेवक प्रा. उत्तम केंदळे, सामाजिक कार्यकर्ते आप्पा नरळे आणि रामदास कुटे यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांनी कचरा वाहतूक करणाऱ्या गाड्या रोखून प्रशासनाविरोधात जोरदार आंदोलन केले. "निगडीकरांच्या आरोग्याशी तडजोड मान्य नाही," असा इशारा देत निर्णय मागे घेण्याची मागणी करण्यात आली.

# मोशीतील विषारी धुरावर महापौरांचा दणका...

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**मोशी परिसरातील विष्णू ग्रीन्स सहकारी गृहरचना संस्थेच्या नागरिकांनी प्लास्टिक, टायर आणि इतर भंगार जाळल्यामुळे वाढलेल्या वायू प्रदूषणाबाबत महापौर रवि लांडगे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित या गंभीर प्रश्नाची महापौरांनी तातडीने दखल घेत महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांची भेट घेऊन संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली.**




### तातडीच्या कारवाईचे आदेश

मोशी परिसरात प्लास्टिक, टायर व भंगार जाळून वायू प्रदूषण करणाऱ्यांविरोधात महापालिका प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. महापौर रवि लांडगे यांच्या हस्तक्षेपानंतर आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी संयुक्त पाहणी, अनधिकृत भंगार साठे हटविणे, दोषींवर कायदेशीर कारवाई आणि कायमस्वरूपी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याचे आदेश संबंधित विभागांना दिले.

मोशी परिसरात वारंवार प्लास्टिक, टायर आणि इतर कचरा जाळला जात असल्याने परिसरात धूर, दुर्गंधी आणि वायू प्रदूषणाची समस्या गंभीर बनली आहे. याचा लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याची बाब नागरिकांनी महापौरांच्या निदर्शनास आणून दिली.

या पार्श्वभूमीवर महापौर रवि लांडगे यांनी संबंधित विभागांनी तातडीने कारवाई करून प्रदूषणाला कारणीभूत असलेल्या व्यक्तींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी आयुक्तांकडे केली.

महापौर म्हणाले, "नागरिकांचे आरोग्य आणि पर्यावरणाची सुरक्षितता ही महापालिकेची सर्वोच्च जबाबदारी आहे. शहरात प्रदूषण करणाऱ्या बेकायदेशीर कृत्यांना कोणत्याही परिस्थितीत पाठीशी घातले जाणार नाही. स्वच्छ हवा, निरोगी पर्यावरण आणि सुरक्षित जीवनमान हा प्रत्येक नागरिकाचा अधिकार असून तो अबाधित राखण्यासाठी प्रशासनामार्फत कठोर व प्रभावी कारवाई केली जाईल."

दरम्यान, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना संयुक्त पाहणी करून तातडीने अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. तसेच अनधिकृत भंगार साठे हटविणे, प्लास्टिक व टायर जाळणाऱ्यांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करणे आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कायमस्वरूपी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याचे आदेश दिले.

यावेळी माजी स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे आणि कविता आल्हाट उपस्थित होत्या. महापौरांच्या पुढाकारानंतर मोशीतील वायू प्रदूषणाच्या समस्येवर महापालिकेने युद्धपातळीवर हालचाली सुरू केल्या असून, नागरिकांना लवकरच दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# शास्त्रज्ञांचे 'मतदान' की व्यवस्थेचा पराभव?



## भूमिका

**भारतीय अंतराळ संशोधन संस्थेतील (इस्रो) शंभराहून अधिक शास्त्रज्ञांनी दिलेले राजीनामे आणि त्याचवेळी खासगी कंपनीच्या 'विक्रम-१' प्रक्षेपकाचे यशस्वी उड्डाण ही केवळ योगायोगाची घटना नाही. ती भारतातील अंतराळ संशोधन क्षेत्रातील बदलत्या वास्तवाची आणि सरकारी संशोधन संस्थांसमोरील नव्या आव्हानांची जाणीव करून देते.**




गेल्या काही वर्षांत भारताने अंतराळ क्षेत्र खासगी उद्योगांसाठी खुले केले. त्यातून स्कायरूट, अग्निकुल कॉसमॉस, पिक्सेल, ध्रुव स्पेस अशा अनेक कंपन्यांनी उल्लेखनीय प्रगती केली आहे. या स्पर्धेमुळे नवकल्पनांना चालना मिळत असली, तरी इस्रोसारख्या प्रतिष्ठित संस्थेतून अनुभवी शास्त्रज्ञ खासगी क्षेत्राकडे वळत असतील, तर त्यामागील कारणांचा गंभीरपणे विचार करणे आवश्यक आहे. इस्रोची उभारणी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या विज्ञानदृष्टीतून आणि डॉ. विक्रम साराभाई यांच्या नेतृत्वातून झाली.

मर्यादित साधनसामग्री असूनही या संस्थेने भारताला जागतिक अंतराळ क्षेत्रात सन्मानाचे स्थान मिळवून दिले. चांद्रयान, मंगळयान आणि उपग्रह प्रक्षेपणातील यश हे त्याचेच फलित आहे. मात्र, वाढत्या अपेक्षांच्या तुलनेत आर्थिक तरतूद, संशोधनासाठी आवश्यक सुविधा आणि मनुष्यबळ यामध्ये पुरेशी वाढ झालेली दिसत नाही. खासगी क्षेत्र अधिक वेतन, आधुनिक सुविधा, निर्णयस्वातंत्र्य आणि संशोधनासाठी अनुकूल वातावरण देत आहे. त्याउलट इस्रोमध्ये प्रशासकीय विलंब, लालफीतशाही, मर्यादित पदोन्नती आणि निर्णय प्रक्रियेतील केंद्रीकरण याबाबत अनेक शास्त्रज्ञांनी नाराजी व्यक्त केली आहे.

त्यामुळे केवळ देशसेवेच्या भावनेवर उत्कृष्ट प्रतिभा दीर्घकाळ टिकवून ठेवणे कठीण होत आहे. भारत विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत असताना संशोधनावरील सार्वजनिक गुंतवणूक वाढविणे अत्यावश्यक आहे. अंतराळ संशोधनासारख्या क्षेत्रात दीर्घकालीन गुंतवणूक, सक्षम पायाभूत सुविधा आणि संशोधकांना स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय जागतिक स्पर्धेत टिकणे शक्य होणार नाही. खासगी क्षेत्राचा सहभाग स्वागतार्ह असला, तरी सरकारी संस्थांचे बळकटीकरणही तितकेच आवश्यक आहे. राजीनाम्यांची लाट आल्यानंतर स्वेच्छानिवृत्तीवर निर्बंध घालण्याचा निर्णय हा समस्येवरचा कायमस्वरूपी उपाय ठरू शकत नाही. प्रतिभावान शास्त्रज्ञांना रोखण्यासाठी आदेश नव्हे, तर विश्वास, संधी आणि संशोधनासाठी पोषक वातावरण आवश्यक असते.

इस्रो ही केवळ एक संस्था नसून भारताच्या वैज्ञानिक स्वप्नांची ओळख आहे. तिचे बळ टिकविण्यासाठी संशोधनाला प्राधान्य, पुरेसा निधी, पारदर्शक प्रशासन आणि गुणवत्तेला योग्य संधी देणे ही काळाची गरज आहे. शास्त्रज्ञांचे राजीनामे हे केवळ नोकरी बदलण्याचे उदाहरण नाही; ते व्यवस्थेने आत्मपरीक्षण करण्याचा इशारा आहे. या संकेताकडे वेळेत लक्ष दिल्यास भारताची अंतराळ झेप अधिक भक्कम होईल; अन्यथा प्रतिभेचे हे स्थलांतर भविष्यात मोठी किंमत मोजायला लावू शकते.

## प्रासंगिक »

### सामर्थ्याची ओळख

**एका गावात सहदेव आणि पांडुरंग हे जिवलग मित्र राहत होते. एके मध्यरात्री सहदेवला विडी ओढायची इच्छा झाली. त्याने काडेपेटी शोधली, पण ती सापडली नाही.**

मग हातात पेटता कंदील घेऊन तो जंगलातील झोपडीत राहणाऱ्या मित्र पांडुरंगकडे गेला. दार ठोठावून त्याने पांडुरंगला उठवले आणि काडेपेटी मागितली.

झोपेतून उठलेल्या पांडुरंगने सहदेवकडे पाहिले. त्याच्या हातात पेटलेला कंदील होता. तो हसत म्हणाला, "अरे सहदेवा, तुझ्या हातात इतका तेजस्वी कंदील असताना विडी पेटवण्यासाठी काडेपेटीची काय गरज? कंदीलावरच विडी पेटवता आली असती."

हे ऐकताच सहदेवला स्वतःची चूक उमगली. आवश्यक साधन स्वतःजवळ असूनही तो दुसऱ्याची मदत मागण्यासाठी धावला होता. त्याला आपल्या हातातील प्रकाशाची जाणीवच झाली नव्हती.

**- तात्पर्य : अनेकदा आपण स्वतःमध्ये असलेले सामर्थ्य, ज्ञान आणि क्षमता ओळखत नाही. आत्मविश्वासाने स्वतःच्या शक्तीची जाणीव ठेवली, तर अनेक समस्या सहज सोडवता येतात.**

इराण-अमेरिका संघर्षाच्या पार्श्वभूमीवर रशियाचे तथाकथित 'प्रलय विमान' (Doomsday Plane) तेहरानमध्ये उतरल्याने आंतरराष्ट्रीय राजकारणात नव्या चर्चांना उधाण आले आहे.

## रशियाचे 'प्रलय विमान' आणि बदलते जागतिक समीकरण



अणुयुद्ध किंवा राष्ट्रीय आणीबाणीच्या परिस्थितीत राष्ट्रप्रमुखांना सुरक्षित ठेवून देशाचे नेतृत्व सुरू ठेवण्यासाठी तयार करण्यात आलेले हे अत्याधुनिक विमान अत्यंत संवेदनशील मानले जाते. त्यामुळे त्याचे तेहरानमध्ये आगमन हा केवळ नियमित लष्करी प्रवास नसून, त्यामागे महत्त्वाचा सामरिक संदेश दडलेला असल्याची चर्चा आहे.

रशिया आणि इराण यांच्यातील संरक्षण सहकार्य गेल्या काही वर्षांत अधिक दृढ झाले आहे. गुप्तचर माहितीची देवाणघेवाण, हवाई संरक्षण प्रणाली आणि संरक्षण करारांमुळे दोन्ही देशांची जवळीक वाढली आहे. अशा परिस्थितीत हे विमान तेहरानमध्ये पोहोचणे म्हणजे इराणला रशियाचा राजनैतिक आणि सामरिक पाठिंबा असल्याचे संकेत मानले जात आहेत.

विशेष म्हणजे हे विमान तेहरानहून थेट मॉस्कोला न जाता बीजिंगकडे रवाना झाले. त्यामुळे या प्रवासामागे कोणती गुप्त बैठक, संवेदनशील चर्चा किंवा महत्त्वाच्या व्यक्तींची हालचाल होती का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. रशिया, चीन आणि इराण यांच्यातील वाढते सहकार्य लक्षात घेता या घडामोडींना अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

तथापि, या सर्व चर्चांमध्ये अधिकृत माहितीचा अभाव आहे. रशिया, इराण किंवा चीन यांनी याबाबत कोणतेही स्पष्ट स्पष्टीकरण दिलेले नाही. अमेरिकेनेही या विषयावर मौन बाळगल्याने विविध तर्क-वितर्कांना अधिक खतपाणी मिळत आहे. अशा वेळी अपुष्ट माहितीच्या आधारावर निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही. युक्रेन युद्धात अडकलेल्या रशियासाठी थेट इराणच्या युद्धात उतरणे सध्या व्यवहार्य वाटत नाही. मात्र, अशा संवेदनशील हालचालींद्वारे रशिया आपल्या मित्रदेशांना पाठिंबा दर्शवत असून, जागतिक शक्तींना राजनैतिक संदेश देत आहे, हे निश्चित.

एकूणच, 'प्रलय विमान' तेहरानमध्ये उतरल्याची घटना ही केवळ विमानाच्या प्रवासापुरती मर्यादित नाही. ती बदलत्या जागतिक सत्तासंतुलनाची, नव्या सामरिक समीकरणांची आणि महासत्तांमधील वाढत्या स्पर्धेची प्रतीकात्मक झलक आहे. आगामी काळात या घडामोडींचा मध्यपूर्वेतील तसेच जागतिक सुरक्षाव्यवस्थेवर काय परिणाम होतो, याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे.

## ।। अभंगवाणी ।।



हरीच्या जागरणा ।
जातां कां रे नये मना ॥१॥

कोठें पाहासील तुटी ।
आयुष्य वेचे फुकासाटीं ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# रोहित पवारांनी मांडली सुप्रिया सुळेंशी विसंगत भूमिका

## खासदार सुप्रिया सुळे यांनी मांडलेल्या भूमिकेपासून रोहित पवार दूर

महाईन्यूज । मुंबई

**राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाबाबत गेल्या काही दिवसांपासून विविध चर्चा होत आहेत. राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घेतलेली स्वतंत्र भेट, मतदारसंघ पुनर्रचना विधेयकावर खासदार सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केलेली भूमिका आणि दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विलिनीकरणाबाबत होत असलेली विविध विधाने यामुळे राष्ट्रवादीत नेमके काय चालले आहे? असा प्रश्न उपस्थित झाला. आता मतदारसंघ पुनर्रचना विधेयकावरून पवार कुटुंबातच विरोधाभास असल्याचे समोर आले आहे.**



रोहित पवार यांनी एक्सवर एक दीर्घ पोस्ट शेअर करत मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाला स्पष्ट विरोध व्यक्त केला आहे. तसेच त्यांनी खासदार सुप्रिया सुळे यांनी जाहीर केलेल्या भूमिकेपासूनही स्वतःला दूर ठेवले आहे. “सर्वच राज्यांत सरसकट जागांमध्ये ५० टक्के वाढ आणि मतदारसंघांचे विभाजन करण्याचे प्रारुप पाहून विधेयकाबाबत निर्णय घेऊ”, असे सुप्रिया सुळे यांनी मागच्या आठवड्यात जाहीर केले होते.

रोहित पवार यांनी आपल्या पोस्टमध्ये या विधेयकाचा जोरदार प्रतिकार केला आहे. त्यांनी लिहिले, “उद्यापासून सुरू होणाऱ्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनात ‘डिलिमिटेशन (मतदारसंघ पुनर्रचना) विधेयक’ मंजूर करून घेणे, हाच सत्ताधाऱ्यांचा मुख्य हेतू आहे. यासाठी गोड बोलून राज्यांना ५० टक्के जागा वाढवून देण्याचे आमिष दाखवले जाऊ शकते. मात्र, या आकड्यांच्या जाळ्यात अडकून जर आपण या विधेयकाला पाठिंबा दिला, तर महापालिका निवडणुकीतील प्रभाग रचनेप्रमाणेच लोकसभा आणि विधानसभेच्या मतदारसंघांचीही राजकीय फायद्यासाठी तोडफोड केली जाईल.”

“भौगोलिक सीमा किंवा घटनात्मक चौकटीचा विचार न करता केवळ सत्ता कायम राखण्यासाठी ही पुनर्रचना केली जाईल आणि आसाममधील मतदारसंघाची पुनर्रचना हे याचे उत्तम उदाहरण आहे”, असे रोहित पवार यांनी लिहिले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील (शरदचंद्र पवार) काही खासदार आणि आमदार हे सत्तेत सहभागी होण्यास आग्रही असल्याची बातमी काही माध्यमांनी मध्यंतरी दाखवली होती. पक्षाने या शक्यता फेटाळून लावल्या होत्या. खासदार सुप्रिया सुळे यांनी कथित सूत्रांच्या माहितीचाही खरपूस समाचार घेतला होता. मात्र आता रोहित पवार यांच्या विरोधी भूमिकेमुळे पक्षात आलबेल नसल्याचे समोर येत आहे.

### ‘विरोधकांना आश्वासनाचे गाजर दाखवले जाईल’

“सत्तेची समीकरणे जुळवण्यासाठी २०१६ पासूनच अनुभवी माजी अधिकाऱ्यांच्या मदतीने कोणत्या मतदारसंघाची कशी तोडफोड करायची, याची रणनीती भाजपाने आधीपासूनच आखली आहे. आता केवळ हे विधेयक मंजूर होण्याची त्यांना प्रतीक्षा आहे. तोपर्यंत विरोधकांशी सलोख्याचे नाटक केले जाईल, विविध आश्वासनांची गाजर दाखवली जातील, विरोधकांना विश्वासात घेतल्याचा दिखावा केला जाईल”, असा आरोप रोहित पवार यांनी केला. ही संपूर्ण प्रक्रिया लोकशाहीच्या मूल्यांवर घाला घालणारी असून, जनतेच्या जनादेशाशी विश्वासघात करण्याचा हा प्रयत्न असल्याचा आरोपही त्यांनी केला.

### ‘माशी झटकावी तसे विरोधकांना झटकले जाईल’

रोहित पवार पुढे म्हणाले, “हे विधेयक मंजूर होताच अंगावरील माशी झटकावी त्याप्रमाणे विरोधकांना बाजूला सारून हुकूमशाही प्रवृत्ती पुन्हा उफाळून येईल. याच प्रवृत्तीने संविधानावर घाला घालण्यासाठी एका बाजूला डिलिमिटेशन आणि दुसऱ्या बाजूला SIR अशी जोरदार तयारी सुरू केली आहे. हा डाव उधळून लावायचा की प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे विधेयकाला पाठिंबा देऊन तो यशस्वी होऊ द्यायचा, याचा सर्वांनीच नीट विचार करण्याची गरज आहे.” लोकशाही, संविधान आणि राज्यघटनेच्या मूल्यांचे रक्षण करण्यासाठी प्रत्येक लोकप्रतिनिधी आणि नागरिकाने या विधेयकाकडे केवळ राजकीय नव्हे, तर राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने पाहण्याची हीच वेळ आहे.

# महायुतीविरुद्ध शड्डू ठोकणाऱ्यांना भाजपात प्रवेश देणे अयोग्य

महाईन्यूज । मुंबई

**शिवसेना शिंदे गटात प्रवेश केलेल्या सहा खासदारांच्या पक्षांतराला लोकसभा अध्यक्षांनी मान्यता दिल्याने आता संसदेत शिवसेनेची ताकद १३ खासदारांची झाली आहे. त्यामुळे शिवसेनाच खरी मजबूत असल्याचे सिद्ध झाले असून, आगामी केंद्रीय मंत्रिमंडळ विस्तारात पक्षाला एक कॅबिनेट आणि एक राज्यमंत्रिपद मिळण्याची शक्यता आहे.**



असा दावा राज्याचे पाणीपुरवठा मंत्री तथा जळगावचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केला.

जळगाव येथे माध्यमांशी संवाद साधताना गुलाबराव पाटील यांनी दिल्लीतील राजकीय घडामोडींसह जिल्ह्यातील विविध विषयांवर भाष्य केले.

माजी मंत्री गुलाबराव देवकर यांच्या भाजप प्रवेशाच्या चर्चेवर प्रतिक्रिया देताना पाटील यांनी नाव न घेता टीका केली. "जे यापूर्वी महायुतीच्या विरोधात लढले, त्यांना पक्षात प्रवेश देण्याबाबत विचार केला पाहिजे. आमच्याकडेही पक्षप्रवेशासाठी इच्छुकांची संख्या मोठी आहे," असे ते म्हणाले.

"ज्यांना राजकीयदृष्ट्या अपेक्षित यश मिळत नाही, ते आपली प्रतिमा सुधारण्यासाठी पक्ष बदलतात," असा टोलाही त्यांनी लगावला.

अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मुद्द्यावरून आमदार किशोर पाटील (पाचोरा) आणि आमदार मंगेश चव्हाण (चाळीसगाव) यांच्यात सुरू असलेल्या वादावर गुलाबराव पाटील यांनी भाष्य केले. "या विषयावर अंतिम निर्णय महसूल मंत्री घेतील. दोन्ही आमदारांशी चर्चा करून हा वाद लवकर मिटविण्याचा प्रयत्न करू," असे त्यांनी सांगितले.

उद्धव ठाकरे यांच्या सरकार बदलण्याच्या विधानावर प्रतिक्रिया देताना पाटील म्हणाले, "केवळ आंदोलन किंवा घोषणाबाजीमुळे सरकार बदलत नाही. जनतेचा विकास करणारे सरकारच टिकते. सध्या राज्य आणि देशात विकासाची कामे सुरू आहेत."

### राजीनाम्याच्या मागणीवरून आदित्य ठाकरेंवर टीका

दिल्लीतील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाबाबत बोलताना ते म्हणाले की, "आंदोलनाच्या ठिकाणी कोण गेले यापेक्षा सरकारचा प्रतिनिधी म्हणून विद्यार्थ्यांचे म्हणणे ऐकून घेणे आणि तोडगा काढणे महत्त्वाचे आहे." केंद्रीय शिक्षण मंत्री तसेच पंतप्रधानांच्या राजीनाम्याच्या मागणीवरून गुलाबराव पाटील यांनी आदित्य ठाकरे यांच्यावर टीका केली. "राजीनामा मागताना कोणाचा राजीनामा मागत आहोत, याचे भान ठेवले पाहिजे.

# राम मंदिर प्रकरणात राजकारण करू नका

## राम मंदिर देणगी घोटाळा प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाचे सर्वच राजकीय पक्षांवर ताशेरे!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**अयोध्येतील श्री रामजन्मभूमी मंदिरात भाविकांनी दिलेल्या देणग्यांमध्ये झालेल्या गैरव्यवहार आणि आर्थिक अनियमिततेच्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने सर्वच राजकीय पक्षांना कडक शब्दांत फटकारलं आहे. "या संवेदनशील मुद्द्यावर कोणीही राजकारण करू नये. हा एका गुन्ह्याशी संबंधित विषय असून याची निष्पक्ष, पारदर्शक आणि योग्य प्रकारे चौकशी करून हे प्रकरण शेवटास नेले पाहिजे," अशा स्पष्ट शब्दांत सर्वोच्च न्यायालयानं आपली भूमिका मांडली.**



प्रकरणाची निष्पक्ष चौकशी व्हावी आणि चौकशीचा अहवाल वेळेत सादर केला जावा, अशी ताकीद देत न्यायालयानं पुढील सुनावणी २७ जुलै रोजी निश्चित केली आहे.

प्रकरणाची सुनावणी सरन्यायाधीश सूर्य कांत, न्यायमूर्ती जोयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर पार पडली. राम मंदिर ट्रस्टच्या देणग्यांमध्ये झालेल्या घोटाळ्याची सीबीआय (CBI) चौकशी व्हावी, यासाठी दाखल याचिकांवर सुनावणी सुरू असताना खंडपीठाने हे भाष्य केले.

उत्तर प्रदेश सरकारनं या प्रकरणाच्या प्राथमिक तपासासाठी विशेष तपास पथक (SIT) स्थापन केले होतं. यामध्ये लखनऊचे विभागीय आयुक्त विजय विश्वास पंत, पोलीस महानिरीक्षक किरण एस. आणि वित्त विभागाचे विशेष सचिव नील रतन यांचा समावेश होता.

उत्तर प्रदेश सरकार आणि केंद्रातर्फे न्यायालयात बाजू मांडताना सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सांगितले की, "SIT ने प्राथमिक चौकशी पूर्ण केली असून सध्या स्थानिक पोलीस या प्रकरणाचा गुन्हेगारी तपास करत आहेत. आतापर्यंत ८ जणांना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून जवळपास ८० लाख रुपयांची रक्कम जप्त करण्यात आली आहे."

यावर न्यायालयाने सुचवले की, ज्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्राथमिक चौकशीत घोटाळा उघडकीस आणला, त्याच तीन सदस्यीय 'SIT' ने यापुढील संपूर्ण तपासावरही देखरेख ठेवावी. यावर उत्तर प्रदेश सरकार योग्य ती पावले उचलेल, असे आश्वासन सॉलिसिटर जनरल यांनी दिले. सुनावणीदरम्यान भाविकांनी दिलेल्या दानात पारदर्शकता आणण्यासाठी महत्त्वपूर्ण सूचना करण्यात आल्या.

### काय आहे संपूर्ण प्रकरण?

जून महिन्यात अयोध्येतील राम मंदिरात अर्पण केलेल्या दानाची मोजणी सुरू असताना, मोठ्या प्रमाणावर रक्कम बँकेत जमा न करता हडप करण्यात आल्याचे आरोप झाले होते. या प्रकरणामुळे देशभरात मोठी खळबळ उडाली होती. वाढत्या दबावामुळं ६ जून रोजी ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय आणि माजी विश्वस्त अनिल मिश्रा यांनी आपापल्या पदांचे राजीनामे दिले होते. त्यानंतर उत्तर प्रदेश सरकारने १३ जून रोजी एसआयटीची स्थापन केली होती. एसआयटीच्या अहवालानंतर पोलिसांनी तत्काळ एफआयआर नोंदवून ८ आरोपींना गजाआड केले.

# अमेरिकेच्या आरोग्य क्षेत्रातील एआय संकटाचा भारतीय आयटी कंपन्यांवर परिणाम

**महाईन्यूज । अमेरिका**

**अमेरिकेतील आरोग्यसेवा आणि जीवन विज्ञान (हेल्थकेअर अँड लाइफसायन्सेस) क्षेत्र भारतातील आयटी कंपन्यांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. दरम्यान, अमेरिकेतील या क्षेत्रावर सध्या आर्थिक ताण आला आहे. तसेच या क्षेत्राने आता कृत्रिम बुद्धिमत्तेवरील (एआय) खर्च वाढवण्यावर भर दिला आहे. त्याचा फटका भारतातील आयटी कंपन्यांना बसत आहे. भारतातील प्रमुख आयटी कंपन्यांच्या उत्पन्नात मागील वर्षी या क्षेत्रातील बदलामुळे घट झाल्याचे दिसून आले.**




### हेल्थकेअर क्षेत्राची कामगिरी का मंदावली?

भारतीय आयटी कंपन्यांसाठी अमेरिकेतील 'हेल्थकेअर आणि लाइफसायन्सेस' क्षेत्र अत्यंत महत्त्वाचे आहे. अमेरिकेतील आरोग्य सेवा पुरवणाऱ्या कंपन्या, विमा कंपन्या, लाइफसायन्सेस कंपन्या व वैद्यकीय उपकरणे तयार करणाऱ्या कंपन्या भारतीय आयटी कंपन्यांच्या ग्राहक आहेत. २०१९ मधील करोना महामारीनंतर अमेरिकेतील आरोग्य सुविधा पुरवणाऱ्या कंपन्यांना सामान्यांना परवडेल अशा सुविधा द्याव्या लागल्या. तसेच अमेरिकेतील सरकारने काही नियम व उपाययोजना लागू केल्याने आरोग्य सुविधांशी संबंधित कंपन्यांवर ताण आला आहे.

जागतिक पातळीवरील अस्थिरता, अमेरिकेतील ग्राहक कंपन्यांकडून बजेटमध्ये केली जाणारी कपात तसेच एआयवरील वाढता खर्च यांमुळे भारतीय आयटी कंपन्यांच्या उत्पन्नात घट झाल्याचे दिसून आले. आयटी कंपन्यासमोर भविष्यात काही आव्हाने निर्माण झाली आहेत. त्याबाबत जाणून घेऊयात.

प्रत्येक मोठ्या आयटी कंपनीचे विविध क्षेत्रांमध्ये स्वत:चे ग्राहक असतात. परंतु, अमेरिकेतील 'हेल्थकेअर आणि लाइफसायन्सेस' हे क्षेत्र व भारतातील आयटी कंपन्या एकमेकांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहेत. अमेरिकेतील या क्षेत्रात सध्या मंदीसदृश वातावरण आहे. उदाहरणार्थ, विप्रो कंपनीचे 'हेल्थ' क्षेत्रातील उत्पन्न एकूण उत्पन्नाच्या १४ टक्के आहे. पहिल्या तिमाहीत त्यात २.६ टक्क्यांनी घट झाली आहे. विप्रोचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) श्रीनी पल्लिया म्हणाले, अमेरिकेतील आरोग्य सेवा क्षेत्रावर दबाव आला आहे. तेथील 'हेल्थकेअर'ची सुविधा देणाऱ्या कंपन्या व विमा कंपन्यांचे बजेट स्थिर राहिले आहे. तसेच या कंपन्या आता एआयवरील खर्च वाढवण्याच्या तयारीत आहेत.

पल्लिया म्हणाले, "आमच्यासाठी त्यांचे बजेट स्थिर राहिले. काही ठिकाणी आम्हाला नकारात्मक वाढ पाहायला मिळाली. सध्या बहुतांश बजेट हे स्वेच्छानिर्णयानुसार केल्या जाणाऱ्या खर्चाकडे वळवले जात आहेत. परंतु, ते प्रामुख्याने एआयवरील खर्च वाढवणार असल्याचे दिसते." भारतातील इतर प्रमुख आयटी कंपन्यांच्याही या क्षेत्रातील उत्पन्नात पहिल्या तिमाहीत घसरण दिसून आली. टीसीएसचे उत्पन्न १ टक्के, तर एचसीएल टेक्नॉलॉजीजचे उत्पन्न ०.५ टक्क्यांनी घटले आहे. यात टेक महिंद्रा ही एकमेव कंपनी अपवाद ठरली. या क्षेत्रात टेक महिंद्राच्या उत्पन्नात २.६ टक्क्यांची सकारात्मक वाढ नोंदवली गेली.

"अमेरिकन सरकारच्या कडक कारवाईमुळे तेथील आरोग्य कंपन्या आणि विमा कंपन्यांची स्वेच्छानिर्णयानुसार खर्च करण्याची क्षमता कमी झाली आहे. भारतीय आयटी कंपन्यांसाठी परिस्थिती अधिक बिकट होण्याचे कारण म्हणजे या अमेरिकन ग्राहकांनी आता त्यांच्या मर्यादित खर्च क्षमतेचा ओघ एआय आणि ऑटोमेशनकडे वळवला आहे. जेणेकरून नफ्यावरील ताण कायम असताना या माध्यमातून खर्च कमी करता येईल", असे एका देशांतर्गत ब्रोकरेजमधील आयटी क्षेत्राचा अभ्यास करणाऱ्या विश्लेषकाने सांगितले.

# गिरिजा ओकने उलगडलं सुखी संसाराचं गुपित



मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत आपल्या दमदार अभिनयामुळे वेगळी ओळख निर्माण करणारी अभिनेत्री गिरिजा ओक सध्या चांगलीच चर्चेत आहे. अभिनयासोबतच ती तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दलही अनेकदा मनमोकळेपणाने बोलताना दिसते. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत गिरिजाने तिचा पती आणि निर्माता सुहद गोडबोले याच्याबद्दल भरभरून कौतुक केले. यशस्वी वैवाहिक आयुष्याचं गमक म्हणजे एकमेकांमधील मैत्री, विश्वास आणि जबाबदाऱ्यांची समान वाटणी असल्याचं तिने सांगितलं. गिरिजाने एका मुलाखतीत सांगितलं की, सुहद हा तिचा केवळ पती नसून सर्वात जवळचा मित्र आहे. कोणत्याही नात्याचा मजबूत पाया हा मैत्रीचा असतो. नात्यातील मैत्री जितकी घट्ट, तितकं ते नातं अधिक मजबूत होतं, असं तिचं मत आहे. गिरिजा आणि सुहद यांची ओळख अगदी कमी वयात झाली. त्यामुळे ते दोघेही आयुष्यातील अनेक टप्पे एकत्र अनुभवत मोठे झाले. गिरिजाचं लग्न अवघ्या २३ व्या वर्षी झालं, तर सुहद त्यावेळी २५ वर्षांचा होता. त्यामुळे एकमेकांच्या स्वभावाची, आवडी-निवडीची आणि विचारांची त्यांना चांगली ओळख आहे. यामुळे त्यांच्या नात्यातील विश्वास अधिक दृढ झाला आहे. ती म्हणाली की, आयुष्यातील ध्येय आणि विचार एकसारखे असतील, तर नातं अधिक सहज आणि सुंदर होतं. दोघेही एकाच दिशेने विचार करत असतील, तर मतभेद कमी होतात. चांगलं काम करावं, अर्थपूर्ण चित्रपटांची निर्मिती व्हावी आणि दर्जेदार भूमिका साकाराव्यात, अशी इच्छा दोघांचीही असल्याने ते एकमेकांना कायम पाठिंबा देतात. गिरिजाच्या मते, त्यांच्या नात्यात जबाबदाऱ्यांचीही योग्य विभागणी आहे. जेव्हा सुहद एखाद्या चित्रपटाच्या निर्मितीत व्यस्त असतो, तेव्हा ती घरातील आणि इतर गोष्टींची जबाबदारी सांभाळते.



## कतरिना कैफने शेअर केले मुलासोबतचे खास फोटो

नुकताच अभिनेत्री कतरिना कैफने तिचा ४३ वा वाढदिवस साजरा केला. यानंतर आता तिने सोशल मीडियावर काही खास फोटो शेअर करत चाहत्यांना सरप्राइज दिलं आहे. या फोटोंमध्ये तिच्यासोबत पती अभिनेता विकी कौशल आणि मुलगा वियानची झलकही पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे, वियानचा चेहरा न दाखवता त्याचे काही गोंडस क्षण कॅमेऱ्यात टिपले आहेत. १६ जुलै रोजी कतरिनाने तिचा वाढदिवस साजरा केला. हा वाढदिवस तिच्यासाठी खास ठरला, कारण मुलगा वियानसोबतचा तिचा हा पहिलाच वाढदिवस होता. आता तिने या खास दिवसाच्या आठवणी चाहत्यांसोबत सोशल मीडियावरुन शेअर केल्या आहेत. या फोटोंमध्ये कतरिना वियानला मांडीवर घेऊन प्रेमाने पोज देताना दिसते. एका फोटो वियान आईचे नाक पकडताना दिसत असून, हा क्षण चाहत्यांच्या पसंतीस उतरला आहे. मात्र, कतरिनाने अद्याप मुलाचा चेहरा सार्वजनिक केलेला नाही. या पोस्टसोबत कतरिनाने भावनिक कॅप्शन देत लिहिले ती म्हणते, "तू माझ्या आयुष्यातील सर्वात अनमोल आशीर्वाद आहेस. देवाने दिलेल्या या सुंदर भेटीसाठी मी कायम आभारी आहे. हा माझ्या आयुष्यातील सर्वोत्तम वाढदिवस होता आणि त्यामागचे कारण तूच आहेस." फोटोंमध्ये कतरिना केशरी आणि निळ्या रंगाच्या आकर्षक ड्रेसमध्ये दिसत आहे. काही फोटोंमध्ये विकी कौशलही तिच्यासोबत दिसत असून, त्यांच्या कुटुंबातील हे खास क्षण चाहत्यांच्या मनाला भिडले आहेत. कतरिनाच्या या पोस्टवर चाहत्यांनी भरभरून प्रेम व्यक्त केले आहे. एका चाहत्याने, "कतरिना, विकी आणि वियानचा हा सुंदर कौटुंबिक क्षण कायम असाच राहो," अशी शुभेच्छा दिली. तर आणखी एका चाहत्याने, "कतरिनाच्या मातृत्वाचा हा प्रवास खूपच गोड आहे," असे म्हटले आहे.

# ग्रेसी सिंग का झाली बॉलिवूडपासून दूर?



बॉलिवूड अभिनेत्री ग्रेसी सिंग आज तिचा ४६ वा वाढदिवस साजरा करत आहे. २० जुलै १९८० रोजी नवी दिल्लीत जन्मलेल्या ग्रेसीने आपल्या साध्या आणि नैसर्गिक अभिनयामुळे प्रेक्षकांच्या मनात वेगळी ओळख निर्माण केली. विशेष म्हणजे, आमिर खानसोबतच्या 'लगान' चित्रपटातील 'गौरी' ही भूमिका आजही चाहत्यांच्या स्मरणात आहे. ग्रेसी सिंगने अभिनयाची सुरुवात थेट चित्रपटांमधून केली नव्हती. १९९७ मध्ये तिने 'अमानत' या दूरचित्रवाणी मालिकेतून अभिनय क्षेत्रात पदार्पण केले. त्यानंतर १९९९ मध्ये 'हु तू तू' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये प्रवेश केला. मात्र, या चित्रपटातून तिला अपेक्षित यश मिळाले नाही. २००१ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'लगान' या चित्रपटाने ग्रेसीच्या आयुष्याला मोठे वळण दिले. या चित्रपटात तिने साकारलेली गौरी प्रेक्षकांना खूप आवडली. चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर मोठे यश मिळवलेच, शिवाय ऑस्कर पुरस्कारांमध्ये 'बेस्ट इंटरनॅशनल फीचर फिल्म' या विभागासाठीही नामांकन मिळाले. या यशामुळे ग्रेसी सिंग रातोरात स्टार बनली आणि तिच्याकडे अनेक मोठ्या चित्रपटांच्या ऑफर येऊ लागल्या. 'लगान'नंतर ग्रेसीने सलग काही यशस्वी चित्रपटांमध्ये काम केले. अजय देवगणसोबतच्या 'गंगाजल' आणि संजय दत्तसोबतच्या 'मुन्ना भाई एमबीबीएस' या दोन्ही चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई केली. या चित्रपटांतील तिच्या अभिनयाचे प्रेक्षकांसह समीक्षकांनीही कौतुक केले. याशिवाय ती 'मुस्कान' या चित्रपटातही झळकली. मात्र, सुरुवातीच्या मोठ्या यशानंतर तिच्या कारकिर्दीचा वेग हळूहळू कमी झाला. मोठ्या बॅनरच्या चित्रपटांमध्ये तिची निवड कमी होत गेली. परिणामी, ग्रेसी हळूहळू चित्रपटसृष्टीपासून दूर गेली आणि तिची उपस्थितीही कमी झाली. ग्रेसी सिंगबाबत एक गोष्ट अनेकांना माहीत नाही. ती स्वभावाने अतिशय शांत आणि मितभाषी आहे. 'लगान'मध्ये गावातील साध्या आणि लाजाळू मुलीची भूमिका साकारल्यानंतर प्रत्यक्ष आयुष्यातही ती फार कमी बोलू लागली. तिच्या या स्वभावाचा अनेकांनी चुकीचा अर्थ लावला. लोकांमध्ये फार न मिसळणे आणि कमी संवाद साधणे यामुळे तिला काही जणांनी 'घमंडी अभिनेत्री' असेही संबोधले.

# स्पेनच्या विजयाला गालबोट

## वर्ल्डकप जेतेपदाचा जल्लोष जीवावर बेतला! १३ वर्षीय मुलाचा मृत्यू

**महाईन्यूज** । स्पेन

**स्पेनने १६ वर्षांच्या मोठ्या प्रतीक्षेनंतर अखेरीस फिफा विश्वचषकावर पुन्हा एकदा आपलं नाव कोरलं. गतविजेत्या अर्जेंटिनाचा पराभव करत स्पेनने वर्ल्डकपवर नाव इतिहास घडवला. मात्र, या जल्लोषाला गालबोट लागलं. विजयानंतर सोमवारी पहाटे सुरू असलेल्या जल्लोषादरम्यान एका मोठ्या कारंज्याचा काही भाग कोसळल्याने १३ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला, तर दोन जण जखमी झाले. या दुर्दैवी घटनेमुळे स्पेनच्या विश्वविजेतेपदाच्या आनंदावर शोककळा पसरली.**



ही घटना सोमवारी मध्यरात्रीनंतर पश्चिम स्पेनमधील सलामांका प्रांतातील सिउदाद रोड्रिगो शहरातील ऐतिहासिक आर्बोल गोर्डो (Arbol Gordo) कारंज्याजवळ घडली. पोर्तुगालच्या सीमेपासून जवळ हे शहर वसलेलं आहे. स्पेनने फिफा विश्वचषक २०२६ च्या अंतिम सामन्यात अर्जेंटिनाचा अतिरिक्त वेळेत १-० असा पराभव करून २०१० नंतर पहिल्यांदाच आणि एकूण दुसऱ्यांदा विश्वविजेतेपद जिंकल्याचा जल्लोष करण्यासाठी शेकडो चाहते जमले होते.

मात्र, जल्लोष सुरू असतानाच या ऐतिहासिक कारंज्याचा वरचा भाग अचानक कोसळून खाली उभ्या असलेल्या चाहत्यांवर पडला. रॉयटर्सच्या वृत्तानुसार, या दुर्घटनेत १३ वर्षीय मुलाचा जागीच मृत्यू झाला, तर दोन जण जखमी झाले. या दुर्दैवी घटनेमुळे स्पेनच्या विश्वविजेतेपदाच्या आनंदाला गालबोट लागलं आहे.

सिउदाद रोड्रिगो नगरपरिषदेने अधिकृत निवेदन जारी करत या दुर्दैवी घटनेबद्दल तीव्र शोक व्यक्त केला. मृत मुलाच्या कुटुंबीयांप्रती आणि मित्रपरिवाराप्रती संवेदना व्यक्त करत नगरपरिषदेने संपूर्ण शहर या दुःखात सहभागी असल्याचं म्हटलं. नगरपरिषदेच्या निवेदनात म्हटलं आहे, “या दुःखद घटनेमुळे संपूर्ण शहर शोकाकुल आहे. मृत अल्पवयीन मुलाच्या कुटुंबीयांच्या आणि मित्रांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. स्पेनच्या राष्ट्रीय फुटबॉल संघाच्या विश्वचषक विजयाचा जल्लोष करण्याचा हा क्षण होता, मात्र त्याचं रूपांतर एका भीषण शोकांतिकेत झालं.”



### स्पेनचा अर्जेंटिनावर थरारक विजय

स्पेनने अमेरिकेतील न्यूयॉर्क-न्यू जर्सी स्टेडियममध्ये झालेल्या फिफा विश्वचषक २०२६ च्या अंतिम सामन्यात अर्जेंटिनाचा अतिरिक्त वेळेत १-० असा पराभव करत तब्बल १६ वर्षांनंतर पुन्हा विश्वविजेतेपदावर नाव कोरलं. २०१० नंतर स्पेनचं हे दुसरं फिफा विश्वचषक विजेतेपद ठरलं. सामन्याचा नायक ठरला फेरान टोरेस. बदली खेळाडू म्हणून मैदानात उतरलेल्या टोरेसने अतिरिक्त वेळेच्या १०६व्या मिनिटाला निर्णायक गोल करत स्पेनला ऐतिहासिक विजय मिळवून दिला. त्याच्या या गोलमुळे स्पेनने अर्जेंटिनाचं विश्वविजेतेपद हिरावून घेत पुन्हा एकदा फुटबॉल विश्वावर आपलं अधिराज्य सिद्ध केलं.

# क्रिकेटपटू अभिषेक पोरेलच्या अटकेचा न्यायालयाचा आदेश

**महाईन्यूज** । नवी दिल्ली

**कलकत्ता उच्च न्यायालयाने क्रिकेटपटू अभिषेक पोरेलच्या अटकेचे आदेश दिले आहेत. अभिषेकसह आणखी एका आरोपीलाही अटक करण्यात यावी असं न्यायालयाने म्हटलं आहे. वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या एका मुलीने या दोघांवर बलात्कारासह अन्य गंभीर आरोप केले होते. खाजगी फोटो काढून ब्लॅकमेल केल्याचाही या दोघांवर आरोप आहे.**



### कोण आहे अभिषेक पोरेल?

२३वर्षीय अभिषेक पोरेल यष्टीरक्षक फलंदाज आहे. ३२ सामन्यात बंगालचं प्रतिनिधित्व करताना १४०८ धावा केल्या आहेत. यामध्ये एक शतक आणि १२ अर्धशतकांचा समावेश आहे. ११४ झेल त्याच्या नावावर आहेत. वृद्धिमान साहा निवृत्त झाल्यानंतर बंगाल संघाच्या यष्टीरक्षणाची धुरा त्याने सांभाळली आहे. २०२३ हंगामात पोरेलने आयपीएल पदार्पण केलं. २०२४ मध्ये त्याला नियमित खेळवण्यात आलं. १४ सामन्यात त्याने १५९च्या स्ट्राईकरेटने ३२७ धावा केल्या. यामध्ये दोन अर्धशतकांचा समावेश आहे. २०२५ मध्ये १३ सामन्यात १४६च्या स्ट्राईकरेटने त्याने ३०१ धावा केल्या. यंदाच्या हंगामात मात्र अभिषेकला अभावानेच संधी मिळाली.

अभिषेक आणि अन्य आरोपीकडचे इलेक्ट्रॉनिक डिव्हाईस तातडीने जप्त करावेत. जेणेकरून त्यामधल्या आक्षेपार्ह अन्यत्र कुठेही जाणार नाहीत याची खबरदारी घ्यावी असं न्यायालयाने म्हटलं आहे.

न्यायमूर्ती सौगत भट्टाचार्य यांनी हुगळीतील मगरा ठाणे पोलिसांना या दोघांच्या अटकेचे आदेश जारी केले आहेत. अभिषेक डोमेस्टिक क्रिकेटमध्ये बंगाल तर आयपीएल स्पर्धेत दिल्ली कॅपिटल्स संघाकडून खेळतो. प्रकरणाच्या सुनावणीवेळी आरोपींच्या वतीने कोणीही उपस्थित नव्हतं.

प्रेम आहे सांगून लैंगिक शोषण करण्यात आलं असा आरोप विद्यार्थिनीने केला आहे. खाजगी फोटो इंटरनेवर प्रसारित करू अशी धमकी देऊन ब्लॅकमेल करण्यात आल्याचा आरोपही आहे. हे फोटो आरोपींच्या फोनमध्ये अजूनही आहेत. यासंदर्भात मगरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र फोन जप्त करण्यात आले नव्हते. विद्यार्थिनीची बाजू मांडणाऱ्या वकिलांनी आरोपींचे फोन लवकरात लवकर जप्त करण्यात यावेत अशी विनंती न्यायालयाला केली. केवळ याच मुलीला नव्हे तर अन्य मुलींचेही खाजगी फोटो घेऊन ब्लॅकमेल केल्याचा आरोप या दोघांवर आहे.

आरोपींना अटक करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचं पोलिसांनी न्यायालयाला सांगितलं. अटकेसंदर्भात काय पावलं उचलली याचा सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश न्यायालयाने दिले. ११ ऑगस्टला याप्रकरणाची पुढील सुनावणी होणार आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
epaper.mahaenews.com
ePaper
। मंगळवार ।
दि. 22 जून 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform


OPEN MINDS.
EXPLORE IDEAS.
SHAPE TOMORROW.

# BA LIBERAL ARTS

THE FREEDOM TO EXPLORE.
THE POWER TO CREATE CHANGE.

A multidisciplinary degree that encourages curiosity, builds perspective and prepares you for a world of possibilities.

- **GLOBAL PERSPECTIVE** Understand the world.
- **CRITICAL THINKING** Question. Analyze. Evolve.
- **COMMUNICATION** Express ideas with impact.
- **INTERDISCIPLINARY LEARNING** Connect concepts. Create solutions.
- **DIVERSE CAREER PATHS** Endless opportunities await.



SCAN QR TO APPLY

+91-8600091180 admission@dypiu.ac.in www.dypiu.ac.in

# ७५ हजार पदवीधर नोंदणी आणि ५ हजार रक्तदानाचे “लक्ष्य”

## भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे पदाधिकाऱ्यांना आदेश

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**“पदवीधर मतदार नोंदणी आणि रक्तदान ही केवळ मोहीम नसून, ती पक्षाच्या संघटनशक्तीची खरी परीक्षा आहे. पिंपरी-चिंचवडने राज्यात आदर्श निर्माण करावा,” असे आवाहन भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्रजी चव्हाण यांनी केले. त्यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी कासारवाडी येथील हॉटेल कलासागर येथे भाजपची पिंपरी-चिंचवड जिल्हा महाबैठक उत्साहात पार पडली.**




आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका, पदवीधर मतदार नोंदणी मोहीम आणि देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या रक्तदान अभियानाच्या पार्श्वभूमीवर ही बैठक महत्त्वाची मानली जात आहे. यावेळी रवींद्र चव्हाण यांनी पदाधिकाऱ्यांना संघटनात्मक काम युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

पिंपरी-चिंचवड शहरात किमान ७५ हजार पदवीधर मतदारांची नोंदणी करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून, प्रत्येक नगरसेवकाने किमान ५०० पदवीधरांची नोंदणी करावी, असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले. नोंदणीसोबतच आवश्यक कागदपत्रांच्या हार्ड कॉपी वेळेत जमा करण्याची जबाबदारीही संबंधित पदाधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे. या मोहिमेचा दररोज आढावा घेण्यासाठी स्वतंत्र चार्ट तयार करून तो जिल्हाध्यक्ष व गटनेत्यांकडे सादर करण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या.

“२० ऑगस्टपर्यंत पदवीधर नोंदणी मोहीम शंभर टक्के पूर्ण झाली पाहिजे. संघटनासाठी काम करणाऱ्यांनाच भविष्यातील संधी मिळतील,” असा स्पष्ट संदेश देत चव्हाण यांनी कार्यकर्त्यांना सक्रिय होण्याचे आवाहन केले.

देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यभरात एक लाख रक्तदानाचा संकल्प भाजपने केला असून, त्यामध्ये पिंपरी-चिंचवडने किमान पाच हजार रक्तदाते उभे करावेत, असे लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे. “मोठे फ्लेक्स आणि जाहिरातींवर खर्च करण्यापेक्षा रक्तदानासारख्या समाजोपयोगी उपक्रमातून जनतेशी नाळ जोडावी,” असेही त्यांनी सांगितले.

यावेळी प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे यांनी संघटनात्मक कामाचा आढावा घेतला. बीएलए-२चे काम पूर्ण झाले असले, तरी मतदार मॅपिंगची गती वाढविण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. पुढील १८ दिवसांत हे काम पूर्ण करण्यासाठी कार्यकर्त्यांनी अधिक जोमाने मैदानात उतरावे, असे आवाहन त्यांनी केले.

महाबैठकीस प्रदेश सरचिटणीस आ. निरंजन डावखरे, प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे, आ. महेशदादा लांडगे, आ. उमाताई खापरे, आ. शंकरशेठ जगताप, आ. अमित गोरखे, संघटन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, सरचिटणीस विकास डोळस, मधुकर बच्चे, वैशाली खाडे, पक्षनेते प्रशांत शितोळे, उपमहापौर शर्मिला बाबर, अभिषेक बारणे, राजेश पिल्ले, दिनेश यादव यांच्यासह सर्व पदाधिकारी, मंडलाध्यक्ष, मोर्चा व आघाडीचे पदाधिकारी, बीएलए-१ आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

बैठकीचे प्रास्ताविक शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांनी केले. सूत्रसंचालन संघटन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे यांनी, तर आभार प्रदर्शन सरचिटणीस विकास डोळस यांनी केले.

> “ भाजपची ताकद ही कार्यकर्त्यांच्या समर्पणात आहे. प्रदेशाध्यक्ष रवींद्रजी चव्हाण यांनी दिलेले ७५ हजार पदवीधर नोंदणी आणि ५ हजार रक्तदानाचे उद्दिष्ट आम्ही केवळ पूर्णच करणार नाही, तर त्याही पुढे जाऊन राज्यात पिंपरी-चिंचवडचा आदर्श निर्माण करू. प्रत्येक मंडल, प्रत्येक बूथ आणि प्रत्येक कार्यकर्ता या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवेल, याची आम्हाला खात्री आहे.
>
> **- शत्रुघ्न काटे, शहराध्यक्ष तथा नगरसेवक, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

# एमआयटी महाविद्यालयात ११४ विद्यार्थ्यांचा सहभाग

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**



विद्यार्थी विकास कक्ष, एमआयटी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, यांच्या वतीने आणि अणुव्रत विश्व भारती सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने “व्यसनमुक्त युवा – विकसित भारत” या जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन शुक्रवार, दिनांक १७ जुलै २०२६ रोजी महाविद्यालयाच्या प्रांगणात करण्यात आले.

कार्यक्रमास उपसंचालिका डॉ. मानसी अतितकर, अधिष्ठाता डॉ. अमोल माने आणि प्रा. रश्मी लाड यांची प्रमुख उपस्थिती लाभली. अणुव्रत विश्व भारती सोसायटीच्या आशाजी रांका यांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला तर सीए मुदित भन्साली यांनी प्रमुख वक्ते म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थी विकास अधिकारी पल्लवी महागांवकर यांनी केले होते.

कार्यक्रमाची सुरुवात आइस ब्रेकिंग ॲक्टिव्हिटीने झाली. त्यानंतर परिचयात्मक चित्रफीत दाखवण्यात आली आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यात आला. सीए मुदित भन्साली यांनी व्यसनाधीनतेचे दुष्परिणाम, शिस्त आणि जबाबदारीचे महत्त्व याविषयी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. यानंतर “मेडिटेट टू एलिव्हेट” या ध्यानधारणा सत्राचे आयोजन करण्यात आले, तसेच विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्त राहण्याची शपथ घेतली.

या कार्यक्रमास एकूण ११४ विद्यार्थी आणि २४ प्राध्यापकांनी उपस्थिती दर्शवली. विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जागृती निर्माण करून त्यांना विकसित भारताच्या दिशेने योगदान देण्यासाठी प्रेरित करणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

# मोशी ग्रामस्थांच्या न्याय्य मागण्यांसाठी ग्रामस्थांसह महापौर रवि लांडगे यांचा पाठपुरावा!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**मोशी येथील वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्प परिसरात घडलेल्या दुर्दैवी दुर्घटनेनंतर नागरिकांमध्ये निर्माण झालेली अस्वस्थता, परिसरातील सुरक्षिततेचे प्रश्न आणि ग्रामस्थांच्या प्रलंबित मागण्यांच्या अनुषंगाने आज पिंपरी-चिंचवडचे महापौर रवि लांडगे यांच्या पुढाकाराने मोशी ग्रामस्थांची महत्त्वपूर्ण बैठक पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या समवेत पार पडली.**



बैठकीमध्ये मोशी ग्रामस्थांनी दुर्घटनेनंतर निर्माण झालेल्या परिस्थितीचा सविस्तर आढावा मांडत, मृतांच्या कुटुंबियांना न्याय मिळणे, दोषींवर कठोर कारवाई, परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेची खात्री, कचरा डेपोमुळे होणारे आरोग्यविषयक व पर्यावरणीय दुष्परिणाम तसेच अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या स्थानिक प्रश्नांबाबत आपल्या भावना आणि मागण्या स्पष्टपणे मांडल्या.

ग्रामस्थांनी प्रत्येक मागणीची सखोल मांडणी करत ही घटना केवळ एका दुर्घटनेपुरती मर्यादित नसून नागरिकांच्या सुरक्षितता, पर्यावरण आणि प्रशासनावरील विश्वासाशी संबंधित अत्यंत गंभीर बाब असल्याचे नमूद केले. मोशीकरांच्या न्याय्य मागण्यांवर कोणतीही तडजोड होणार नसून प्रशासनाने याकडे सर्वोच्च प्राधान्याने पाहण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बैठकीत स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, विधी समिती सभापती सुजाता बोराटे, प्रभाग अध्यक्षा अर्चना सस्ते, नगरसदस्या सारिका गायकवाड, सारिका बोऱ्हाडे, माजी उपमहापौर शरद बोऱ्हाडे, माजी नगरसदस्य धनंजय आल्हाट, मंदा आल्हाट, सामाजिक कार्यकर्ते राजेश सस्ते, उदय गायकवाड, निलेश बोऱ्हाडे, नितीन बोऱ्हाडे तसेच मोशी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मोशी ग्रामस्थांनी मांडलेल्या प्रत्येक प्रश्नावर सकारात्मक चर्चा झाली असून, महापौर रवि लांडगे आणि आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी समन्वयाने तातडीने आवश्यक कार्यवाही करून प्रलंबित कामे आणि न्याय्य मागण्या शक्य तितक्या लवकर मार्गी लावण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचा विश्वास ग्रामस्थांना दिला.

# वाल्हेकरवाडीत इलेक्ट्रिक दुचाकींना आग

## अग्निशमन दलाच्या तात्काळ कारवाईमुळे आग आटोक्यात, दोन महिलांचे वाचविले प्राण

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**वाल्हेकरवाडी येथील दगडोबा चौक परिसरात सोमवारी सकाळी निवासी इमारतीच्या पार्किंगमध्ये चार्जिंगसाठी लावलेल्या इलेक्ट्रिक दुचाकींना अचानक आग लागल्याची घटना घडली. घटनेची माहिती मिळताच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने तात्काळ घटनास्थळी धाव घेत तीन अग्निशमन वाहनांच्या सहाय्याने युद्धपातळीवर बचाव व अग्निशमन कार्य हाती घेतले.**



प्राथमिक माहितीनुसार, चार्जिंगदरम्यान लागलेल्या आगीने अल्पावधीतच भीषण रूप धारण केले. या आगीत तीन इलेक्ट्रिक दुचाकी पूर्णपणे जळून खाक झाल्या. त्यानंतर आगीने शेजारील दोन मजली इमारतीलाही वेढा दिला. आग लागल्यानंतर इमारतीच्या पहिल्या व दुसऱ्या मजल्यावर अडकलेल्या दोन महिलांची अग्निशमन दलाच्या जवानांनी धाडसाने व सुरक्षित सुटका केली. अग्निशमन दलाच्या तत्पर आणि नियोजनबद्ध कारवाईमुळे कोणतीही जीवितहानी टळली.

घटनेची माहिती मिळताच अग्निशमन विभागाचे अधिकारी व कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी तसेच आग परिसरातील इतर ठिकाणी पसरू नये यासाठी शर्थीचे प्रयत्न करण्यात आले. अग्निशमन दलाच्या वेगवान प्रतिसादामुळे आग अधिक वाढण्यापासून रोखण्यात यश आले.

याप्रसंगी उप अग्निशमन अधिकारी गौतम इंगवले यांच्या मार्गदर्शनाखाली लीड फायरमन विनायक नाळे व शहाजी कोपनर तसेच फायरमन प्रल्हाद कोरडे, पंकज रसाळ, अमोल कुऱ्हाडे, इरफान बेलदार, एकनाथ ढगे, सखाराम चिमटे, भूषण येवले, तुषार बिरहाडे, सोहन तुकदेव, प्रकाश गव्हाणे, तेजस्वी पाटील, एकनाथ बुधवंत, सागर लावंडे, सागर गुरव, राहुल धुमाळ, महेश गरड, बालाजी सानप आदी कर्मचाऱ्यांनी आग आटोक्यात आणण्यासाठी आणि बचावकार्य यशस्वी करण्यासाठी मोलाची भूमिका बजावली.

### नागरिकांना आवाहन

निवासी इमारतींमध्ये चार्जिंग करताना आवश्यक ती खबरदारी घेतल्यास अशा दुर्घटना टाळता येऊ शकतात. पिंपरी चिंचवड महापालिकेचे अग्निशमन दल नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सदैव सज्ज असून, या घटनेत जवानांनी दाखविलेल्या तत्परतेमुळे दोन महिलांचे प्राण वाचविण्यात यश आले. तसेच आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी घाबरून न जाता त्वरित १०१ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन यावेळी अग्निशमन विभागातर्फे करण्यात आले.

## आषाढी एकादशी निमित्त एसपीजी इंटरनॅशनल पब्लिक स्कूलमध्ये भक्तिमय पालखी सोहळा उत्साहात

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**आषाढी एकादशीच्या पावन निमित्ताने भोसरी येथील एसपीजी इंटरनॅशनल पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये पारंपरिक वारकरी संस्कृतीचा अनुभव देणारा भव्य पालखी सोहळा उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. टाळ-मृदंगाचा गजर, अभंग, भजन, दिंडी आणि विद्यार्थ्यांच्या आकर्षक सांस्कृतिक सादरीकरणामुळे संपूर्ण शाळा परिसर विठ्ठलनामाच्या जयघोषाने दुमदुमून गेला. कार्यक्रमाचे नियोजन शाळेचे मुख्याध्यापक प्रवीण गायकवाड, तैसीन मुलाणी, सुप्रिया मुळे, एकता जाधव आणि निशा वाघमारे यांनी उत्कृष्टरीत्या केले.**



### समृद्ध संतपरंपरेचे प्रेरणादायी दर्शन

पालखी दिंडी, अभंग, भजन आणि वारकरी परंपरेचे दर्शन घडविणाऱ्या विविध उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना महाराष्ट्राची समृद्ध संत परंपरा, भक्ती, शिस्त, एकता आणि संस्कार यांचे महत्त्व अनुभवता आले. विद्यार्थ्यांमध्ये सांस्कृतिक मूल्यांची जपणूक करण्याचा संदेश देणारा हा पालखी सोहळा सर्वांच्या स्मरणात राहील असा प्रेरणादायी आणि अविस्मरणीय ठरला.

या सोहळ्यास पांडुरंग (नाना) गवळी, सौ. सुनीता माई पांडुरंग गवळी, स्वप्नील पांडुरंग गवळी, सौ. कोमल स्वप्नील गवळी, संकल्प पांडुरंग गवळी, मनीषा थोरात, महाविद्यालयाच्या प्राचार्या जयश्री सुरवसे तसेच वैशाली यादव यांची प्रमुख उपस्थिती लाभली. नाना आणि माई यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम पार पडला. यावेळी स्वप्नील पांडुरंग गवळी यांनी विद्यार्थ्यांना वारकरी परंपरा, संस्कार आणि जीवनमूल्यांवर प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उषा खराबे, गीतांजली बडदे आणि अश्विनी मांजरेकर यांनी प्रभावीपणे केले. विद्यार्थ्यांनी विठ्ठल, रुक्मिणी तसेच विविध संतांच्या वेशभूषेत पारंपरिक नृत्ये सादर करून उपस्थितांची मने जिंकली. पूजा रेड्डी आणि प्रेमलता कापसे यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता आठवीतील विद्यार्थ्यांनी आकर्षक नृत्य सादर केले, तर इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी विठ्ठल आणि संतांच्या वेशभूषेत सादर केलेल्या नृत्याला विशेष दाद मिळाली.

विद्यार्थ्यांकडून उत्कृष्ट नृत्य तयारी अंगारिका पाटील आणि मुस्कान शर्मा यांनी करून घेतली. पालखी सोहळ्याचे महत्त्व पल्लवी तांबे यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व शिक्षक, शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

## समिप्ता वाव्हळने पटकावला रौप्यपदक

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**



आपल्या परिसरातील समिप्ता गणेश वाव्हळ हिने स्वित्झर्लंडमधील झुरिच येथे आयोजित करण्यात आलेल्या प्रतिष्ठित 38th Sri Chinmoy Marathon Swim या आंतरराष्ट्रीय जलतरण स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावत भारताचा तिरंगा सातासमुद्रापार अभिमानाने फडकवला आहे. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे परिसरासह संपूर्ण देशाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

दि. 19 जुलै 2026 रोजी रॅपर्सविल-झुरिच (स्वित्झर्लंड) येथे पार पडलेल्या या स्पर्धेत समिप्ताने भारताचे प्रतिनिधित्व केले. जगभरातील विविध देशांतील जलतरणपटूंमध्ये झालेल्या चुरशीच्या स्पर्धेत तिने उत्कृष्ट कामगिरी करत रौप्यपदकावर आपले नाव कोरले.

लहानपणापासून जलतरणाची आवड जोपासणाऱ्या समिप्ताने कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण सराव आणि जिद्दीच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. तिच्या या यशामुळे तरुण पिढीला प्रेरणा मिळणार असून, आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतीय खेळाडूंची ताकद पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

समिप्ताच्या या यशाबद्दल विविध स्तरांतून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, नागरिक, क्रीडाप्रेमी आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.

“समिप्ताने केवळ पदक जिंकले नाही, तर भारताचा गौरव वाढवत देशाचा तिरंगा अभिमानाने फडकवला आहे. तिची ही कामगिरी प्रत्येक भारतीयासाठी अभिमानास्पद आहे,” अशा भावना नागरिकांकडून व्यक्त केल्या जात आहेत.


Knowledge is Power
Dr. D. Y. Patil
Varale Campus
A World of Career Opportunities Awaits
Dr. SUSHANT PATIL
GROUP
A Journey towards, Innovation, Excellence, Growth & Success
शोध, नवोपक्रम, उत्कृष्टता आणि वाढीचा प्रवास.....
An Autonomous Institute - Affiliated to Savitribai Phule Pune University
POLYTECHNIC
Diploma
ENGINEERING
B. Tech | B.E.
MANAGEMENT
MBA | MCA
ARCHITECTURE
B. Arch | M. Arch
ADMISSIONS
OPEN 2026-27
Contact Us
93590 04652 | 76667 20378
76668 29653 | 78220 99218
www.dypcoei.edu.in | www.dypimed.edu.in | www.dypatiltcs.com | www.dypatilarch.com
1
KM
From Talegaon Railway Station